म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ४५०
REFBK-0004604

निबंधी
८५०

...थसंग्रहालयाच्या १९३२ सालच्या
वार्षिक समारंभाचे
अध्यक्ष

# प्रो. वामन मल्हार जोशी यांचें भाषण

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. नि. नं. ८०२
ता. २१/४/३३
ठाणें

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ६६३२
ठाणें

(विषय: जीवित व वाङ्मय)

REFBK-0004604

पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९३६।२ येथें आर्यभूषण छापखान्यांत
रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें व प्रो. वा. म. जोशी
यांनीं हिंगणें येथें प्रसिद्ध केलें.

किंमत १ आणा.

१९३२

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ४६०४

## ठाणें येथील ग्रंथसंग्रहालयाच्या १९३२ सालच्या वार्षिक समारंभाचे अध्यक्ष

# प्रो. वा. म. जोशी यांचें भाषण

ग्रंथालय ठाणे
ग्रं. क्र. ४४०४

आपण मला आज अध्यक्ष या नात्यानें बोलावून आणून येथें चार शब्द बोलण्याची संधि दिलीत हा आनंददायक बहुमान तर खराच, पण खरें सांगावयाचें म्हणजे यावेळीं माझ्या मनांत विरोधी कल्पना, विरोधी भावना व विरोधी विचार यांचा कलह चालला आहे हें मला प्रांजलपणें कबूल केलें पाहिजे. एखाद्याला लोकांनीं ठाण्यास आणावयाचें म्हणजे तुरुंगांत किंवा पागलखान्यांत घालावयास आणावयाचें अशी कल्पना क्षणभर मनांत येऊन चमत्कारिक भाव-भावना उत्पन्न होऊं लागतात, पण लगेच आपल्या ग्रंथसंग्रहालयाची आठवण होऊन मन स्थिर होऊं लागतें, व अध्यक्ष म्हणून निमंत्रित असल्यामुळें तर तें अभिमानानें फुगूं लागतें. पण तदनंतर लगेच आपल्या संस्थेच्या दिवंगत अशा थोर संस्थापकांची, चालकांची, अध्यक्ष म्हणून बोलावलेल्या पाहुण्यांची आठवण होऊन त्यांच्या मृत्यूमुळें झालेली आपली व महाराष्ट्राची हानि मनास खिन्नता आणते. कैलासवासी विनायक लक्ष्मण भावे वगैरे मंडळींचें गुणवैभव व आपलें स्वतःचें गुणदारिद्र्य यांचा विचार चढलेल्या मनाला खालीं ओढून आणीत असला तरी त्या गुणाढ्य व बुद्धिवैभवशाली वाङ्मयभक्तांची पुण्यस्मृति आपल्या हृदयांत सदाशा व सदाकांक्षा उत्पन्न करतात ही त्यांतल्या त्यांत आनंदाचीच गोष्ट आहे.

व्यक्तिविषयक विचार-विकार सोडून देऊन आपल्या ग्रंथसंग्रहालयासारख्या ग्रंथसंग्रहालयाकडे पाहिलें तरीसुद्धां माझें मन द्विधा होतें व हृदयांत कालवाकालव सुरू होते. ग्रंथसंग्रहालयामुळें ग्रंथकारांची स्मृति मृत्यूनंतर देखील कायम राहते असें आपण म्हणतों, पण खरें पाहिलें असतां पुष्कळ वेळां असें दिसून येतें कीं, ग्रंथकारांचीं पुस्तकें नांवाला व शोभेलाच कपाटांत असतात, उपयोगाच्या दृष्टीनें पाहिलें तर तीं केवळ स्मृतिशेष असतात! मला तर पुष्कळ वेळां असें वाटतें कीं, ईजिप्तच्या मनोऱ्यामध्यें तेथील राजांचीं वगैरे शवें मीठ-मसाल्यांत घालून जशीं ठेवण्यांत आलेलीं आहेत, किंवा वेस्ट मिन्स्टर ॲबीमध्यें जसें इंग्लंडमधील राजांचीं, मुत्सद्यांचीं, कवींचीं वगैरे प्रेतें जशीं गौरवपूर्वक पुरलेलीं असतात व प्रयत्नपूर्वक त्यांचें तेथें जसें रक्षण केलें जातें त्याप्रमाणेंच कांहीं थोरथोर ग्रंथ-

पुस्तकांना गौरवपूर्वक कपाटांमध्यें ठेवलेलें असतें व तेथें त्यांचें कृमि-कीटकापासून काळजीपूर्वक रक्षण केलें जातें. ( कित्येक वेळां हें रक्षण देखील केलें जात नाहीं ! ) Milton is more admired than read असें म्हणण्यांत येतें हें आपणांस ठाऊकच आहे. ग्रंथसंग्रहालयांतील वैदिक व उपनिषद्विषयक वाङ्मय कपाटांतच बहुधा पडून रहात नाहीं काय ? मराठींतल्या जुन्या कवींच्या ग्रंथांना कपाटांतल्या सुरक्षित स्थानापासून पदच्युत करण्याचा अत्याचार सहसा कोणी करीत नसावा अशी माझी समजूत आहे. पुष्कळ ग्रंथ आपणांस पूज्य असतात, पण नामस्मरणापलीकडे त्यांची भक्ति सहसा कोणी करीत नाहीं. एका ' उमर ' नामक मुसलमानानें अलेक्झांड्रिआ येथील ग्रंथालय जाळलें असें म्हणतात तें खरें असेल तर हें वाईट केलें असें म्हटलें पाहिजे, पण तें जाळलें नसतें तरी त्यांतले किती ग्रंथ आज उपलब्ध असते व उपलब्ध असलेल्यांपैकीं किती आज मितीस वाचले गेले असते हा विचार मनांत आला म्हणजे कसेंसेंच वाटूं लागतें. कठीण व गंभीर स्वरूपाच्या विदग्ध वाङ्मयाचीच नव्हे तर काव्यें, नाटकें, कादंबऱ्या वगैरे ललितवाङ्मयाची देखील अशीच अवस्था होते. फार पुरातन काळचें ललितवाङ्मय सोडलें व गेल्या सात आठ शतकांतलेंच ललितवाङ्मय पाहिलें तरी देखील मन अस्वस्थ होतें. मानभावी कवि महीन्द्र व्यास याचें ' लीळा-चरित्र ' किंवा भास्कर कवीश्वर व्यासाचें ' शिशुपालवध ' किती लोकांनीं वाचलें आहे ? मुकुन्दरायाचा ' विवेक-सिन्धु ' किती लोकांनीं पाहिलेला आहे ? एकोणी-साव्या शतकांतले कवि, नाटककार, कादंबरीकार वगैरे घेतले तरी देखील हीच अवस्था दिसते. कीर्तिकरांचें ' इन्दिरा 'काव्य, कुंट्यांचें शिवाजी काव्य, बाबा पदमजी यांचें ' यमुना-पर्यटन ', मोरोबा कान्होबा यांची ' घाशीराम कोतवाल ' ही कादंबरी, हळब्यांची ' मुक्तामाला ' कादंबरी, हीं व अशींच पुस्तकें नांवानेंच पुष्कळांना ठाऊक आहेत, म्हणजे तीं बहुतेक नामशेषच झालीं आहेत !

ग्रंथ वाचले गेले नाहींत तरी ग्रंथकर्त्यांची कीर्ति त्यांच्या मागें राहते ही त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट आहे. कवींचा पांचभौतिक देह नष्ट होईल पण त्यांचा यशोरूपी देह अजरामर आहे असें आपण म्हणतों तें थोडेंसें खरें आहे.

> जयन्ति ते सुकृतिनो रससिद्धाः कवीश्वराः ।
> नास्ति येषां यशःकाये जरा-मरण-जं भयम् ॥

या सुभाषिताची येथें कांहीं लोकांना आठवण होईल व बरें वाटेल. पण लगेच असा विचार येईल कीं, हें तरी पूर्णपणें खरें आहे काय ? कीर्ति अजरामर असून उपयोग काय हा प्रश्न सोडून दिला तरी ती खरोखरच अजरामर असते काय हा विचार अस्वस्थता उत्पन्न करणारा आहे. किरकोळ किंवा सामान्य लोकांची गोष्टच बोलावयाला नको. होमर, वगैरेंच्या अस्तित्वाबद्दलच शंका उत्पन्न

होऊं लागल्या आहेत ! ज्ञानेश्वराचें नांव आहे पण यशाला वांटेकरी दोघे होऊं पहात आहेत.' वामना'च्या यशाला तर कितीतरी वांटेकरी आहेत व आतां नलदमयन्ती स्वयंवराख्यान करणारा खरा रघुनाथ कोण व तोतया रघुनाथ कोण हें ठरविणें रा. प्रियोळकर, प्रो. पंगू वगैरेंच्या कर्तबगारमुळें कठीण झालेलें आहे !

ग्रंथकारांचें यश जरी अजरामर नसलें व त्यांचे ग्रंथ जरी कालवश होत असले तरी त्यांचें खरें कार्य, म्हणजे सद्विचार, सद्वासना व सद्भावना यांचा विकास करणें, हें केव्हांहि होतच असतें व मानवी संस्कृतीची व्याप्ति व उच्चता यांत प्रत्येक ग्रंथकारानें भर घातल्यामुळें सुसंस्कृतिरूपी कार्यसिद्धीमुळें त्या त्या व्यक्तीचेंहि अवतारकृत्य चिरंजीवी झालें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. ग्रंथकारांच्या देहापेक्षां, ग्रंथांपेक्षां किंवा कीर्तीपेक्षां त्यांचें संस्कृति-वृद्धिविषयक कार्य अधिक महत्त्वाचें व मौल्यवान आहे हें कोणीहि कबूल करील. व्यक्तिदृष्ट्या कितीतरी कवि व इतर ग्रंथकार स्मृतिशेष झाले असतील, पुष्कळांची स्मृति देखील राहिलेली नाहीं ही गोष्ट खरी असेल; पण व्यक्तिगत अमरत्वाच्या अभावीं कवींना वगैरे असें समाधान मानतां येणार नाहीं का कीं,आपल्या वाङ्मय-कृतीच्या द्वारें आपण जगाच्या ज्ञानांत, नीतिमत्तेंत, सत्प्रवृत्तींत, सात्त्विक आनंदाच्या साधनांत वगैरे भर घातली आहे ? असें समाधान मानणें खरोखर शक्य आहे असें प्रथम दर्शनीं तरी वाटतें ( व अखेरहि हेंच मत कदाचित् खरें ठरेल ). पण मध्यन्तरीं विचारी मनुष्याच्या मनांत अशी कल्पना येते कीं अलीकडे आपल्या नीतिमत्तेच्या कल्पना पार बदलल्या आहेत, ध्येयें बदललीं आहेत, खरें-खोटें ठरविण्याच्या कसोटीबद्दल वाद सुरू आहेत, अशा स्थितीमध्यें पूर्वीच्या ग्रंथकारांचे प्रयत्न विफलच नव्हे तर भलत्या मार्गाला नेणारे व समाजाच्या प्रगतीला अजाणतां विरोध करणारे होते असें मानतां ( व म्हणतांहि ) येणार नाहीं काय ? राजनिष्ठेची पूर्वीची कल्पना गेली, पातिव्रत्याची कल्पना बदलली, नीतिमत्तेचें स्वरूप पालटलें, धर्मांबद्दलच्या भावना नष्ट ( निदान हीनवल ) झाल्या, पूर्वीचे तेहतीस कोटी देव जाऊन एक देवच शिल्लक राहिला व तोहि निर्गुण निराकार होऊन पंचत्वाप्रत जाऊं लागला,-अशा स्थितींत असें नाहीं का म्हणतां येणार कीं, पूर्वकवींनीं राजनिष्ठेचें, पातिव्रत्याचें, नीतीचें, देवधर्माचें वगैरे विशिष्ट ध्येय आपल्या मधुर-वाणीनें लोकांना प्रिय व पूज्य करण्याचा प्रयत्न केला त्यामुळें विशिष्ट भाव–भावना दृढमूल होऊन गेल्या व प्रगतीच्या दृष्टीनें त्यांचें उच्चाटन करण्याचें (किंवा निदान त्यांचें रूपान्तर करण्याचें) जें आवश्यक काम तें अधिक कठीण झालें ?

कोणतेंहि शास्त्र घ्या, पूर्वीच्या कल्पना पार चुकीच्या होत्या असें अलीकडे वाटूं लागलें आहे असें आपण जर पहात आहों तर पूर्वीच्या शास्त्रकारांनीं व

वाङ्मयभक्तांनीं चुकीचीं प्रमेयें दृढमूल करून समाजाच्या प्रगतींत एकाअर्थी विघ्नच उत्पन्न केलेलें नाहीं काय ! विज्ञान म्हणजे आधिभौतिक शास्त्रें यांतील matter म्हणजे प्रकृति याबद्धलच्या कल्पना आतां इतक्या बदलल्या आहेत कीं, पूर्वींच्या एतद्विषयक कल्पना भ्रममूलक व भ्रमकारक वाटूं लागल्या आहेत. गणितांतील प्रमेयें तरी त्रिकालाबाधित असावींत, पण तींहि तशीं दिसत नाहींत. दिक् (Space) आणि काल (Time) याबद्धल अलीकडील विवेचन इतकें चमत्कारिक झालें आहे कीं, तें खरें मानलें तर आपण इतके दिवस मोठ्या भ्रमांत होतों असें मानावें लागतें व डोकें भ्रमण करूं लागतें. इतिहासशास्त्राकडे पाहिलें तर जगाच्या इतिहासाचा प्रवाह कोणीकडे वाहतो आहे, व जगांतील घडामोडी कोणत्या प्रमुख कारणास्तव होत आहेत याबद्धल एकवाक्यता नाहीं. जग म्हणजे माया आहे असें म्हणणारे कांहीं आहेत, तर संसार म्हणजे लीलावतार घेणाऱ्या ईश्वराचें लीलानाटक आहे असें कांहीं म्हणतात. बकल(Buckle)म्हणणार हवापाणी, व जमिनीचें स्वरूप व भौगोलिक परिस्थिति यांवर राष्ट्रांचा इतिहास अवलंबून आहे, तर बुसे ( Bousset ) व विको ( Vico ) म्हणणार कीं इतिहासावरून मानवी प्रयत्नापेक्षां ईश्वरी योजना अधिक प्रभावशाली असते असें सिद्ध होतें. फिश्ट (Fichte) ईश्वर वगैरे न म्हणतां इतिहासावरून असें सिद्ध होतें म्हणतो कीं, जगांत श्रद्धेचा पाडाव होऊन विवेकबुद्धीचा व स्वतंत्र विचाराचा दिवसेंदिवस विजय होत चालला आहे. डोनाल्ड ( Donald ) आणि दी मेस्त्रे ( De Maistre ) याच्या उलट असें म्हणतो कीं, जगाच्या इतिहासावरून असें दिसतें कीं, हरतऱ्हेची अव्यवस्था व अराजकता नको असली तर धर्मसंरक्षण आवश्यक आहे. कार्ल मार्क्स (Karl Marx) धर्म वगैरेंचें बंड कमी करूं पाहतो व म्हणतो कीं, आर्थिक कारणांस्तव जगांतल्या सर्व घडामोडी होत आहेत ! हेगेल Thesis, (साधन), Anti-Thesis (प्रतिसाधन) व Synthesis (संसाधन) अशा पायऱ्यांचें इतिहासविवरण करतो हा एक तिसराच प्रकार व आणखी असे दुसरेहि प्रकार आहेत ! इतिहासाच्या मुख्य बाबींबद्धलच जर अशा प्रकारची बेबंदशाही आहे, तर मग ग्रंथालयांतील इतिहासाचीं कपाटें आंतील ग्रंथांसह जाळून टाकलीं तर काय वाईट ?

दुसऱ्या एका दृष्टीनें मला मुसलमानी सरदार उमरप्रमाणें इतिहासावरचीं सर्व पुस्तकें जाळून टाकावींशीं वाटतात. हिंदु-मुसलमानांचीं भांडणें, त्याचप्रमाणें इंग्रजांचीं व हिंदुवासीयांचीं भांडणें यांच्या मुळाशीं भावना प्रक्षुब्ध करणाऱ्या खऱ्याखोट्या ऐतिहासिक हकीकती आहेत हा विचार मनांत येऊन महात्मा गांधींनीं एकदां असें लिहिलें होतें कीं, हा सर्व इतिहास जाळतां किंवा बुडवितां आला तर फार चांगलें होईल आणि अशाच विचारामुळें प्रेरित होऊन मीं वरील विधान केलें

आहे. धर्मा-धर्मांमधलीं भांडणें पाहून धार्मिक ग्रंथहि नष्ट करून टाकावेत असें मला कित्येक वेळां वाटतें !

मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या वार्षिक उत्सवाच्या मंगलप्रसंगीं ग्रंथालयाविषयीं असले अशुभ विचार मी प्रदर्शित करीत आहें. ते विचार-प्रवर्तनार्थं—केवळ पूर्वपक्ष म्हणून करीत आहें-ते विचार सिद्धान्तस्वरूप नव्हे हें ध्यानांत धरावें. ग्रंथांनीं व अर्थात् ग्रंथालयांनीं जीवित खरोखरच रम्यतर, उच्चतर व उदात्ततर झालें आहे, का परंपरागत चाल म्हणूनच कांहीं मंगलप्रसंगीं आपण सरस्वतीपूजन करतों त्याप्रमाणें सारस्वताचीहि पूजा परंपरागत चाली करतांच आपण करतों असा माझ्या-पुढें प्रश्न आहे. माझें असें ठाम मत आहे कीं, वाङ्मयामुळें मानवी जीवित दिवसें-दिवस अधिकाधिक रम्य होत आहे, संसार अधिकाधिक विवेकयुक्त आहे व शुद्ध-तेचें आणि औदार्याचें राज्य चढतें-वाढतें आहे. पण प्रथम दर्शविलेल्या शंका कांहीं वेळां तरी विचारशील मनुष्याच्या मनांत येतात तेव्हां त्यांचा विचार करणें आवश्यक आहे. हा विचार ' जीवित व वाङ्मय ' हा विषय आजच्या भाषणाकरितां निवडण्याच्या मुळाशीं आहे.

दुसरा हेतु असा आहे कीं, वाङ्मय हें केवळ आनंदाकरितां व करमणुकी-करितां आहे, जीवितामध्यें अधिक महत्त्वाची त्याची उपयुक्तता नाहीं, अशा प्रकारचें जें एक प्रमेय आहे तें सदोष कसें आहे याचें दिग्दर्शन करून ग्रंथांचें व प्रस्तुत ग्रंथसंग्रहालयासारख्या संस्थांचें वास्तविक अवतार-कृत्य मनोरंजनांचीं साधनें पुरविणें याहून उच्चतर आहे असें दाखवावें. वाङ्मयामुळें उपभोगाचीं व मनोविनो-दनाचीं साधनेंच वाढलीं एवढेंच त्याचें कार्य नव्हे, तर त्यामुळें उपभोगक्षमता वाढलेली आहे, व उपभोग घेण्याचे प्रकार, हेतु, रीति वगैरेंमध्यें शुद्धत्व व उच्चत्व येऊन जीविताचें रम्यत्व व जीवनार्हत्व हीं वाढत आहेत असें दाखविण्याचा माझा विचार आहे तो जरी अल्पांशानें साध्य झाला तर मला फार आनंद होईल.

वाङ्मयाचा जीवितावर जसा परिणाम होतो तसा उलट जीविताचा व परिस्थितीचाहि परिणाम होत असल्यास कसा होतो व कितपत होतो हें दाखवून आपल्या महाराष्ट्रीयांचें जीवित विविध, सात्त्विक, साहसयुक्त, सत्याचें अधिष्ठान असलेलें, उच्च आकांक्षांनीं प्रेरित झालेलें, तेजस्वी व पराक्रमी असें असेल तर आपलें वाङ्मयहि अधिक उच्च, तेजस्वी, रमणीय, आदरणीय होईल व या ग्रंथालयासारख्या संस्थांची उपयुक्तता व लोकप्रियता अधिक प्रत्ययाला येतील असें मला व्याख्या-नाच्या अखेरीस दाखवावयाचें आहे.

मध्यन्तरीं जो आपण धागा सोडला तो आतां पुनः हातांत घेऊं या. शास्त्रांतले पूर्वींचे सिद्धान्त खोटे ठरूं पहात आहेत, तेव्हां शास्त्रांचा सर्व खटाटोप व्यर्थच नव्हे तर अपकारक झाला आहे असा मी क्षणभर पूर्वपक्ष केला पण मानवी उन्न-

तीच्या आड येणाऱ्या अडचणींनीं चिडून न जातां आपण शान्तपणें विचार केला तर असें दिसून येईल कीं, या अडचणींमुळें निराश होण्याचें कांहीं कारण नाहीं. पूर्वीच्या ग्रंथांतील पुष्कळ सिद्धान्त चुकीचे ठरले असतील पण चुकीचे ठरले ही देखील एक प्रगतीची पायरी आहे. मानवी मन ज्या ज्ञानात्मक, नीतिविषयक व रसास्वादविषयक पूर्णतेच्या शोधांत आहे त्याकडे जाणारे खरे मार्ग सांपडले नसले तरी विशिष्ट मार्ग तिकडे जात नाहींत ही माहिती उपयुक्त आहे. दुसरी गोष्ट अशी कीं विद्येचा शोध काय, सुखाचा शोध काय, किंवा दुसरा कोणताही शोध काय, सिद्धीपेक्षां शोधांतच अधिक मौज आहे. निरनिराळे शास्त्रकार व वाङ्मयभक्त हाडाचीं काडें करून जी बौद्धिक धडपड करीत असतात ती हौस म्हणून करीत असतात, आकुंचित फलप्राप्तीच्या किंवा यशःसिद्धीच्या अपेक्षेनें नव्हे. फल किंवा यश नको असतें असें नाहीं, तर तें आवश्यक नसतें. तिसरी व महत्त्वाची गोष्ट अशी कीं, शास्त्रकारांच्या व वाङ्मयभक्तांच्या ग्रंथांचा व त्यांतील जुनाट झालेल्या ( किंवा जुनाट वाटणाऱ्या ) विचारांचा किती जरी वीट आला तरी ही गोष्ट खरी कीं ग्रंथांच्या द्वारें मानवी प्रगतींत एकंदरींत भरच पडली आहे. कांहीं ग्रंथांतलीं प्रमेयें चुकीचीं ठरलेलीं असतील, पण ही चूक केव्हां तरी व कोणी तरी करणें अपरिहार्य होतें व ती झाली म्हणून एका अर्थी खऱ्या मार्गाचें आक्रमण शक्य झालें. ग्रंथालयें म्हणजे पूर्वकालीन प्रमादांचा संग्रह, पुरावा, व प्रदर्शन असें जरी आपण वादाकरितां क्षणभर मानलें तरी पूर्वकालीन प्रमादांचा संग्रह करणारीं ग्रंथालयें उपयुक्तच मानलीं पाहिजेत, कारण हा संग्रह केल्यानें पूर्वीच्या प्रमादांची ( ग्रंथालयांचा उपयोग करणाऱ्या लोकांकडून तरी ) पुनरावृत्ति व्हावयाची नाहीं !

पांडित्याचा निर्वेद कित्येक वेळां येतो ही गोष्ट खरी आहे. पण आपण ही गोष्ट नेहमीं ध्यानांत धरावी कीं मनुष्याला जिज्ञासा दिलेली आहे, विचारशक्ति दिलेली आहे, सौंदर्यलालसा आहे, रसास्वादलोलुपता आहे व एतद्विषयक प्रेरणा इतक्या प्रबळ आहेत कीं, परिणाम कांहींहि होवो, यशःसिद्धि होवो किंवा न होवो, त्यांनीं प्रेरित होऊन मनुष्य ते ते व्यापार करीत राहणारच. उदाहरणार्थ, इतिहास कितीहि जरी अपुरा किंवा चुकीचा असला तरी मनुष्याचें मन कांहीं वेळ तरी मागें वळून भूतकाळाकडे पाहत राहणारच. खरा इतिहास लिहिणें शक्य नाहीं म्हणून सर वॉल्टर रॅलेप्रमाणें सर्व विद्यमान इतिहासकारांनीं इतिहासग्रंथ लिहिण्याचें बंद केलें व ग्रंथालयांतील ऐतिहासिक ग्रंथ झाडून सारे जाळून टाकले तरी मानवी जातीची इतिहासापासून सुटका होईल असें नव्हे. होईल काय, तर बरावाईट थोडासा कांहीं जो इतिहास आहे तो जाऊन त्याऐवजीं दंतकथांचा, लोकप्रवादांचा व आजीबाईच्या गोष्टींचा कांहीं काळ सुळसुळाट होईल व कालान्तरानें त्यांतल्या त्यांत जो कोणी उद्योगी व विशेष चौकस असेल तो आपण

ऐकलेल्या गोष्टी लिहून ठेवील व असे अनेक लोक एका पाठीमागून एक येऊन व एकमेकांच्या माहितीची छाननी करून पुनः इतिहास–ग्रंथ लिहितील. हा इतिहास नसून इतिहासाभास असेल, पण आभास असा किंवा नसो, मागें वळून पाहण्याची खोड मानवी मनाला जोंपर्यंत आहे तोंपर्यंत ऐतिहासिक असें नांव धारण करणारें कांहीं तरी त्याला पाहिजे, व तो तें निर्माण करणार अशी ही स्थिति असल्यामुळें, पूर्वींचीं ऐतिहासिक प्रमेयें चुकीचीं ठरलीं म्हणून आतां इतिहासच नको असा त्राग न करतां मनुष्यानें असा विचार करावा कीं, इतिहास आवश्यकच जर आहे तर तो शक्य तेवढा खरा व परिपूर्ण असावा व तो सदोष जरी असला तरी तो अजीबात न टाकतां पुढील पिढ्यांकडून दुरुस्त होईल या आशेनें त्याचें रक्षणच करावें व हें रक्षण योग्य रीतीनें व्हावें म्हणून या ग्रंथालया-सारखीं ग्रंथालयें काढावीं. इतिहासासंबंधानें जें म्हटलें तेंच तत्त्वज्ञान, शास्त्रें, काव्यें, कादंबऱ्या वगैरेसंबंधानें मला म्हणावयाचें आहे. हीं सर्व सदोष असतील, पण वैराग्यानें किंवा वैतागानें त्यांचा त्याग न करतां विवेकपूर्वक व तारतम्यानें त्यांचा भोग घेणें हाच सुज्ञतेचा मार्ग होय.

कित्येक लोक हें कबूल करतात, पण असें म्हणतात कीं, ग्रंथ व ग्रंथालयें हीं करमणुकीचीं व चैनीची साधनें म्हणून उपयुक्त आहेत, त्यांची अधिक योग्यता नाहीं. Literaturer is a luxury असें तीव्र जीवनकलहाच्या या दिवसांत वाटणें साहजिक आहे. बुभुक्षित लोकांना व्याकरणावर दुपारची वेळ भागवतां येत नाहीं, तहान लागली असतां काव्यरस पिऊन चालत नाहीं—

**बुभुक्षितैर्व्याकरणं न भुज्यते**
**पिपासितैः काव्यरसो न पीयते ।**

हें खरें आहे. त्याचप्रमाणें अति वाचनानें किंवा अति विचारानें कर्मविमुखता उत्पन्न होते आणि कित्येक वेळां तर आपल्या इकडील अर्जुनाप्रमाणें किंवा शेक्सपिअरनें वर्णिलेल्या हॅम्लेटप्रमाणें व्यामोह उत्पन्न होऊन अकीर्तिकर अशी कर्मशून्यता प्राप्त होण्याची भीति असते, हेंहि खरें आहे. उपवर वधूसाठीं वरशोधन चाललें असतां तत्त्वनिरत वेदान्त्यांना वर म्हणून निवडूं नये अशीं कांहीं वचनें आहेत त्यांतील भावार्थ हाच कीं, विद्याव्यासंगी व तत्त्वचिंतनरत लोक संसाराला नालायक ठरतात! परंतु या सर्व गोष्टी जरी खऱ्या असल्या तरी त्यांचा अर्थ एवढाच होऊं शकेल कीं, फाजील तत्त्वचिंतन हें घातुक आहे व तें शक्य तोंवर टाळावें. विद्याव्यासंग हा केवळ करमणुकीचा किंवा चैनीचा प्रकार असावा असें त्यापासून अनुमान काढतां येणार नाहीं.

ललितवाङ्मय हें ज्ञानवृद्धीकरितां नव्हे किंवा उपदेशाकरितां नव्हे, तर तें आनंदाकरितां आहे, रसास्वादाकरितां आहे, असें कांहीं लोक जें म्हणतात त्यामुळें

वाङ्मयभक्ति हा एक बौद्धिक भुक्तीचा, म्हणजे सुखोपभोगाचा व चैनीचा प्रकार आहे या म्हणण्याला पुष्टि येते. पण ललितवाङ्मयाचें ध्येय आनंद आहे,—सरस्वती देवी ही मयूरासनावर बसलेली आहे, व्यासपीठावर नव्हे. हें जरी मान्य केलें तरी सरस्वती मयूरावर बसून जें नृत्य करते किंवा ती गायन-वादन जें करते, तें सर्व केवळ मनोविनोदनार्थ आहे असें मानतां येत नाहीं. विद्येचा जो ब्रह्मानंद-तुल्य आनंद आहे तोच विद्येचा प्रमुख हेतु हें खरें; पण या आनंदाच्या अनुषंगानें मनोवृत्ति शुद्धतर व उन्नततर होणें शक्य आहे. कांहीं कांहीं कोट्या, विनोदी पदें, कविता-प्रहसनें वगैरेंचें कार्य म्हणजे तात्पुरता एक प्रकारचा आनंद देणें व घटकाभर मनाची करमणूक करणें एवढेंच असूं शकेल हें मी जाणतों व अशा कोट्या, कविता, प्रहसनें वगैरे त्याज्य किंवा निंद्य आहेत असें ह्मणणाऱ्यांपैकीं मी नाहीं. पण अशा प्रकारचें वाङ्मय हें उच्चतम नव्हे, त्यायोगानें आत्म्याचें परिपूर्ण समाधान होत नाहीं, हेंहि तितकेंच खरें आहे असें माझें मत आहे. आनंदाकरितांच वाङ्मय असलें तरी आनंदा-आनंदामध्यें फरक असतो व पायऱ्या असतात हेंहि विसरून चालावयाचें नाहीं. विद्यानंद हा ज्या ब्रह्मानंदाचा भाऊ आहे म्हणून वर्णन करतात त्या ब्रह्मानंदाची योग्यता सांगतांना तैत्तिरीय उपनिषदांत म्हटलें आहे कीं,

सैषा आनंदस्य मीमांसा भवति ।
युवा स्यात् साधुयुवाध्यायकः ।
आशिष्ठो बलिष्ठो द्रढिष्ठः ।
तस्येयं पृथिवी सर्वा वित्तस्य पूर्णा स्यात् ।
स एको मानुष आनंदः ।
ते ये शतं मानुषा आनंदाः स एको मनुष्यगंधर्वाणामानंदः ।
... ... ... ... ... ...
ते ये शतं प्रजापते रानंदाः ।
स एको ब्रह्मणो आनंदः ।

निरनिराळ्या वाङ्मयकृतींपासून किंवा कलाकृतींपासून प्राप्त होणाऱ्या आनंदाच्या देखील अशाच प्रकारच्या पायऱ्या थोड्या बहुत लावतां येतील. उत्तम वाङ्मयकृतीपासून आनंदाचीच अपेक्षा करावयाची हें तत्त्व खरें आहे, पण या दृष्टीनें पाहतां उच्चतम वाङ्मयकृतीपासून जो आनंद होईल त्याच्याबरोबर सद्वासनांचें पोषण व सत्प्रवृत्तींचें उत्तेजन होईल, आणि मन अधिक शुद्ध, सुसंस्कृत व उन्नत होईल. विलायती फुलें सुंदर असतात, पण त्यांच्या जोडीला वास नसतो; तरी पण तीं त्याज्य नव्हेत, तर त्यांचें सौंदर्य

अभिनंदनीयच असतें. तथापि सौंदर्याबरोबर सुवासाची जोड मिळाली तर तें फूल अधिक रमणीय व आदरणीय होणार नाहीं काय ? उत्तम हरदासाचें कीर्तन ऐकतांना ज्याप्रमाणें तेथील परिस्थितीमुळें इंद्रियें तृप्त होतात, गायनाचा लाभ मिळतो, हास्यरसाचा आस्वाद घेतां येतो, सदुपदेश मिळतो, अध्यात्माकडे प्रवृत्ति होते व एकंदरींत अनेकविध सात्विक व उन्नतस्वरूप आनंदाचा लाभ घडतो, त्याचप्रमाणें उत्तम वाङ्मयकृतींपासूनहि जो आनंद होतो त्यांत अनेक सद्वस्तूंचा लाभ होऊं शकतो. ऑथेल्लोसारखें नाटक किंवा रघुवंशासारखें काव्य किंवा ज्ञानेश्वरीसारखा अध्यात्मावरचा काव्यात्मक ग्रंथ याचें परिशीलन आनंदाकरितांच केलें तरी त्यायोगें करून मनोवृत्तीचें शोधन व उन्नतीकरण होणार नाहीं काय ? आणि हें नैतिक पोषणच नव्हे तर काय ? सद्ग्रंथांतील नैतिक उपदेश वगैरे अप्रत्यक्ष असेल, पण हवेप्रमाणें अप्रत्यक्ष असला किंवा लांबून येणाऱ्या सुवासाप्रमाणें तो कशापासून उत्पन्न होत आहे हें जरी कळत नसलें तरी तो कमी परिणामकारक असें मात्र नव्हे. कलाकृति ही कलाकृती-करितांच असते, कलाविलासाचा हेतु कलाविलासच असतो, काव्यानंद हा काव्यानंदाकरितांच असतो, असें किती जरी आपण कंठशोष करून म्हटलें तरी ज्या काव्यनाटकादि कृतींपासून सन्मनोवृत्तीचें परिपोषण होत नाहीं, सद्गुण अधिक प्रिय होत नाहीं, मनाचें औदार्य वृद्धिंगत होत नाहीं, थोर लोकांच्या थोर मनाचें आकलन अधिक सुलभ होत नाहीं, सौजन्यामुळें उत्पन्न झालेल्या आपत्ती पुरवल्या पण दौर्जन्यामुळें प्राप्त होणारी हर-तऱ्हेची संपात्ति नको अशी मनोभूमिका तयार होत नाहीं, जगांतील विविध प्रसंगांतील मर्म ओळखण्याची अधिक पात्रता येत नाहीं—अशा वाङ्मयकृति क्षणभर किंवा घटकाभर आनंददायक झाल्या तरी त्या खालच्या दर्जाच्या होत यांत काडीमात्र शंका नाहीं. या कृति ‘ खालच्या दर्जाच्या ’ असें मीं म्हटलें आहे, त्याज्य किंवा निंद्य म्हटलेलें नाहीं, हें ध्यानांत धरावें. करवंदीचीं फुलें हीं गुलाबाची सर पावूं शकलीं नाहींत, किंवा जांभळांना द्राक्षांची सर आली नाहीं, म्हणून तीं टाकाऊ ठरवावयाचीं हें केव्हांहि उचित नव्हे. टाकाऊ तर नव्हेतच उलट तीं देखील आस्वाद्य आहेत असेंच मी म्हणेन. व फुला-फळांची भाषा सोडून ग्रंथांची भाषा वापरावयाची म्हणजे मी म्हणेन कीं, प्रस्तुत ग्रंथसंग्रहालयासारख्या संस्थेंत लहान थोर, खालच्या दर्जाच्या व वरच्या दर्जाच्या, सर्व ग्रंथांचा संग्रह झाला पाहिजे, कारण प्रसंगभेदानें व अभिरुचिभेदानें सर्व ग्रंथ आस्वाद्य व उपयुक्त, किंबहुना आवश्यक, होऊं शकतात.

आतां आपणांला उच्च दर्जाचे जे ग्रंथ पाहिजेत ते कसे उत्पन्न होणार हा प्रश्न आपल्यापुढें उभा राहील. याला माझ्या मतें उत्तर असें आहे कीं, आपण वाचक

जे आहेत ते उच्च झाल्याशिवाय उच्च वाङ्मय निर्माण होणें अशक्य नसलें तरी कठीण आहे. काव्यामध्यें 'ध्वनिकाव्य' उत्तम असें समजतात व केवळ शब्दालंकारादिप्रचुर काव्यें अधम समजतात. पण काव्यांतील ध्वनि समजण्याची पात्रता जर श्रोत्यांच्या किंवा वाचकांच्या अंगीं नसेल, तर ध्वनिकाव्यें पुष्कळ प्रमाणांत निघावींत कशीं ? व्यवहारांत आपण ज्याप्रमाणें म्हणतों कीं योग्यतेप्रमाणें जें मिळावयाचें तेंच त्याला मिळतें (Every man gets what he deserves) किंवा अलीकडच्या राजकारणांत ज्याप्रमाणें 'यथा राजा तथा प्रजा' ही म्हण जाऊन 'जशी प्रजा तसा राजा' अशी म्हण रूढ होऊं पाहते आहे, त्याप्रमाणेंच वाङ्मय-साम्राज्यांत देखील वाचकांच्या सामर्थ्याला अनुसरूनच पुस्तकांची निर्मिति होत असतें असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं.

एखाद्या राष्ट्राचें वाङ्मय त्यांतील लोकांच्या जीवितावर अवलंबून असतें हें दोन दृष्टींनीं मला सांगावयाचें आहे. एक दृष्टि अशी कीं आडांत नसेल तर पोहऱ्यांत कोठून येईल या न्यायानें लोकांच्या जीवितांतच जर राम नसेल, तें जर काव्यशून्य, ध्येयशून्य, साहसशून्य, विविधताहीन, सद्गुणसंपत्ति-रहित असेल, तर त्यांचें वाङ्मयहि उच्चगुण-विहीनच असणार. आपले लोक जर दूर देशचे प्रवासच करीत नसतील तर मनोवेधक प्रवासवर्णनें आपल्या वाङ्मयांत कशीं मिळतील ? आपण जर नौकागमन केलें नाहीं, नौका-युद्धें कशीं होतात तीं लांबून देखील पाहिलीं नाहींत, तर त्यांचीं वर्णनें आपण कशीं करावयाचीं ? आपल्या जीवितांतच जर ध्येयवादित्व नसेल तर वाङ्मयांतच तेवढें ध्येयवादित्व कसें दिसेल ? आपल्या जीवनांतच काव्य नसलें तर काव्यांत काव्यत्व कसें दिसावें ? आपल्या जीवनक्रमांत जर विविधता नसेल, तर आपल्या कादंबऱ्यांच्या व लघुकथांच्या कथानकांत विविधता कोठून येणार ? आपला इतिहास बनविणें आपल्या हातांत नाहीं, आपण परकीयांच्या ओंजळीनें पाणी पितों, अर्थात् आपणांस वाचण्यास मिळणारा इतिहास देखील उष्टा असतो. राष्ट्राचा नवा इतिहास करण्याचें सामर्थ्य असलेले भारत-सेवक लोकमान्य महात्मे निघाल्याशिवाय उत्तम इतिहास निर्माण होणें कठीण. आधीं इतिहास करावा म्हणजे मग इतिहासकार निघतात. रामानें किंवा मारुतीनें पराक्रम केला म्हणजे मग वाल्मीकि, कालिदास वगैरे त्यांचे पराक्रम वर्णन करणारे निघणें सुलभ होतें. आपण स्वतः आधीं केलें मग सांगितलें असें रामदास म्हणतात. पण स्वतः नाहीं तर नाहीं, आपल्या राष्ट्रांतील दुसऱ्यानें कां होईना कांहीं ना कांहींतरी सांगण्यासारखें केल्याशिवाय सांगणाऱ्यानें काय सांगावें ? वाङ्मय म्हणजे राष्ट्रांतील जीवनाचा प्रतिध्वनि असेंच केवळ मला म्हणावयाचें नाहीं. व्हाल्टेअरसारख्यांच्या लेखणीनें तलवारीपेक्षां पराक्रम केला आहे हें मला ठाऊक आहे. पण राष्ट्रांतील जीवनाच्यापुढें कांहीं पावलें

२१।५।३३

वाङ्मयानें उडी मारली व राष्ट्राला उडी मारण्यास शिकविलें तरी ही उडी बऱ्याच अंशानें राष्ट्राच्या जीवनावर अवलंबून असते यांत शंका नाहीं. अर्थात उच्च, विविध, स्वयंज्योति व तेजस्वी वाङ्मयाची अपेक्षा असेल तर आपल्या राष्ट्राचें जीवितहि तशाच प्रकारचें पाहिजे. कांहीं लोकांना असें वाटतें कीं, आपण कांहीं लिहीत नाहीं, वाचीतदेखील नाहीं, आपल्या जीविताचा व वाङ्मयाचा संबंध काय? पण तसें नाहीं. राष्ट्रांतील लोकांचें जीवन जर सुधारलें व तें विविध, उत्साह-शून्य, ध्येयनिष्ठ व साहसयुक्त झालें, तर असे लोक वाङ्मयोपकारक आहेत असें मी समजतों,—मग त्यांनीं एकहि ग्रंथ लिहिलेला नसो, किंवा काव्यें, नाटकें, कादंबऱ्या वगैरे वाचलेल्याहि नसोत!

वाङ्मयामध्यें काय असलें पाहिजे, वाङ्मयांतील रस म्हणजे काय, रसोत्पत्ति कशी होते, वगैरेबद्दलच्या कल्पना जर लोकांच्या सदोष असतील तर त्यांचें वाङ्मयहि सदोष असेल या दृष्टीनेंहि लोकजीविताचा वाङ्मयाशीं संबंध येतो. या मुद्याचें विशेष विवरण न करतां रसविषयक कांहीं कल्पना सदोष आहेत हें आपल्या वाङ्मयांतील कांहीं दोषांचें एक कारण आहे याचें विवरण करून मी आवरतें घेणार आहें. रसोत्पत्ति जी होते ती रसिकांच्या हृदयांत होते, रसिकाचें हृदय हें रसाचें स्थान होय, ही गोष्ट कांहीं लेखकांच्या ध्यानांत येत नाहीं. काव्यनाटकादि वाचून किंवा पाहून रसिक हा आपल्या पदरचें—आपल्या स्वानुभवाचें—पुष्कळसें घालतो व ही स्वानुभवाची भर जशी व जेवढी घातली जाईल तशी व तेवढी रसोत्पत्ति होते हेंहि चांगलेसें ध्यानांत न आल्यामुळें कांहीं लेखक उत्तान व असंस्कृत वर्णनाच्या भरीस पडतात आणि वाङ्मयाचा दर्जा कमी करण्यास अजाणतां कारणीभूत होतात. उदाहरणार्थ, हास्यरस उत्पन्न करावयाचा म्हणजे पात्रांनीं हसलेंच पाहिजे असें नाहीं, किंवा त्यांनीं कोट्या केल्याच पाहिजेत असें नाहीं, हें कांहीं जणांच्या ध्यानांत येत नाहीं. कारणाशिवाय कांहीं पात्रें रडताहेत असा देखावा आपण नाटकांत पाहिला किंवा कादंबरींत वाचला तर अशा शोकानें हास्यरस उत्पन्न होऊं शकेल. बरें, याच्या उलट एखादा सज्जन किंवा एखादी सुशील स्त्री महत्संकटांत असतां कांहीं पाजी लोक हंसताहेत असा जर देखावा आपण पाहिला किंवा त्याचें वर्णन वाचलें तर या हास्यानें आपलें मन शोकरसपूर्ण होऊं शकेल. उदाहरणार्थ, द्रौपदीवस्त्रहरणाचे प्रसंगीं कांहीं दुष्ट लोकांना मौजच वाटते आहे व ते हंसत आहेत असा देखावा आपण पाहिला तर आपणांला अतिशय वाईट वाटेल व रागहि येईल. मुलगा आईच्या उदरांतून येतो तेव्हां तो रडतो पण इतर लोक आनंदित होऊन त्यांच्या मुखावर स्मित चमकूं लागतें, व सत्पुरुष मृत्युशय्येवर असतां इतर लोक शोकरसमग्न होतात पण त्यांच्या मुखावर कृतकृत्यतेचें व प्रसन्नतेचें स्मित असतें या गोष्टी या संदर्भांत विचार करण्यासारख्या आहेत.

तात्पर्य असें कीं, शोकरस उत्पन्न करण्यास पात्रांनीं रडलेंच पाहिजे असें नाहीं व हास्यरस उत्पन्न करण्यास पात्रांनीं स्वतः हंसलेंच पाहिजे असें नाहीं. सर्व कांहीं दृश्य किंवा वर्ण्य प्रसंगांवर व प्रेक्षकाच्या किंवा वाचकांच्या मनोभूमिकेवर अवलंबून आहे. नाट्यशास्त्रकार भरतमुनींनें हें तत्व चांगलें ओळखलें होतें. उदाहरणार्थ, हास्यरसासंबंधानें विवेचन करताना त्यानें हास्याचे दोन प्रकार मानले आहेत! एक आत्मस्थ व एक परस्थ—

द्विविधो हास्यरसः।
आत्मस्थः परस्थश्च।
यदा स्वयं हसति तदा आत्मस्थः ।
यदा परं हासयति तदा परस्थः।

पण परस्थ हास्यरस व आत्मस्थ हास्यरस यांतील तारतम्य विसरलें गेल्यामुळें नाटकांत वगैरे हास्यरसाचे प्रसंगीं उगाच विदूषकी पोरखेळ किंवा कोट्या पात्रांकडून करविण्यांत येतात व शोकरसाचे प्रसंगीं हास्योत्पादक हुंदके व हेल ऐकविण्यांत येतात.

शृंगाररसाच्या बाबतींत तर कांहीं लोकांची अशी कल्पना झालेली दिसते कीं शृंगारिक भाषण किंवा नाट्य केल्याशिवाय या 'रसराजाची' उत्पत्तिच व्हावयाची नाहीं. पण खरा प्रकार असा आहे कीं, रंगभूमीवर आलेल्या किंवा कादंबऱ्यांत वगैरे वर्णिलेल्या नायक-नायिकांच्या वगैरे सरळ साध्या भाषणांनीं व वागण्याच्या पद्धतीनें कित्येक वेळां नाजूक शृंगाररस जसा उत्पन्न होतो तसा ग्राम्य व उत्तम शृंगारिक देखाव्यांनीं व भाषणांनीं उत्पन्न होत नाहीं. ( अशा देखाव्यांच्या द्वारें शृंगाररस उत्पन्न करण्याची लेखकाची इच्छा असते, पण रस उत्पन्न होत असलाच तर तो हास्य किंवा बीभत्स रस असेल ! )

रसोत्पत्तीचे बाबतींत देखाव्यांतील किंवा भाषणांतील शब्द हे निमित्तमात्र होत, बराचसा भाग रसिकांच्या हृदयानें भर घातलेला असतो, ही गोष्ट ध्यानांत धरली म्हणजे रसिकांच्या योग्यतेला व सामर्थ्याला अनुसरून वाङ्मय कसें निर्माण होतें हे ध्यानांत येईल. साधी एखादी वस्तु पाहतांना देखील त्या वस्तूपासून निघणाऱ्या किरणांवरच आपली भिस्त नसून आपल्या स्मृतीनें, कल्पनाशक्तीनें वगैरे किती तरी भर घातलेली असते असें मानसशास्त्रज्ञ म्हणतात. मग रसाचे बाबतींत ही भर किती असेल हें सुज्ञांना सांगावयास नको. काव्य—नाटकादिकांचा आस्वाद घेतांना अपरिहार्यतेनें इतकी भर घालणारा जो वाचकवर्ग व श्रोतृवर्ग त्यांच्या मनःसंस्कृतीवर वाङ्मय-निर्मिति केव्हांहि अवलंबून राहणार. कारण लेखक जो लिहितो तो काल्पनिक व ध्येयात्मक रसिकवर्गालाच उद्देशून नेहमीं लिहितो किंवा त्यांनीं तसें लिहावें, हें म्हणणें चुकीचें

आहे. विद्यमान रसलोलुप वर्गालाच उद्देशून सामान्यतः लेखन असणार व या वर्गाच्या वाङ्मयसौंदर्य–विषयक कल्पनांवर, ध्येयांवर व अभिरुचीवर वाङ्मय पुष्कळसें आधारलेलें असणार हें साहजिक आहे.

[illegible] ुप वर्ग जो आहे त्याला नांवें ठेवून व त्याची कुचेष्टा करून आपली प्रतिष्ठा वाढवून घेण्याच्या भरीस न पडतां हा वर्ग दिवसेंदिवस अधिक सुसंस्कृत कसा होईल या दिशेनें विचार करण्यास लागलें पाहिजे, व असा विचार करूं लागलें असतां ज्या ग्रंथ-संग्रहालयाच्या वार्षिक उत्सवांत आपण भाग घेत आहोंत तशा ग्रंथसंग्रहालयांची उपयुक्तता आपल्या ध्यानांत येऊं लागते व अशा संस्थांना धनिकांनीं धनाच्या द्वारें, अनुभवी वृद्धांनीं सल्लामसलतीच्या द्वारें, कार्यकुशलांनीं उत्साहयुक्त कार्याच्या द्वारें, व इतर वाङ्मयभक्तांनीं येथें ठेवलेल्या ग्रंथांचा योग्य तो उपयोग करून घेऊन, यथामति, यथाशक्ति व यथासंभव सहाय्य द्यावें असें म्हणावेसें वाटतें. प्रस्तुत ग्रंथसंग्रहालयानें तर मराठी वाङ्मयाच्या क्षेत्रांत फारच मोठी कामगिरी केली आहे व करीत आहे. पण ठाणें येथील लोकांना बाहेरच्या माणसानें येऊन ती सांगणें म्हणजे देशावरच्या माणसानें कोंकणांत जाऊन तेथील लोकांना नारळी-पोफळींचा उपयोग काय हें शिकविण्यासारखें आहे, म्हणून तसल्या फंदांत न पडतां माझे विचार शान्तपणें ऐकून घेतल्याबद्दल आपले आभार मानून मी खालीं बसतों.

इति शम्

REFBK-0004604

ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ४६०४